# भारतीय स्त्रीमुक्ती विचार उदय आणि परंपरा

प्रा.डॉ.विवेक गं. देशमुख (मराठी विभाग प्रमुख) स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड, जि.अमरावती.

## वेदकाळातील स्त्रीमुक्ती विचार

मराठी साहित्यातील स्त्रीमुक्तीचा विचार करतांना आपल्या समोर सर्वात प्रथम पाश्चात्त्य स्त्रीमुक्तीच्या संकल्पनेचा विचार येतो. पण स्त्रीमुक्तीच्या संकल्पनेचा ऐतिहासिक आढावा घेतांना भारतीय संस्कृतीतही स्त्रीमुक्तीच्या संकल्पनेची बीजे दिसून येतात. उदा. पूर्ववैदिक काळात स्त्री व पुरूष यांच्या समानत्वाची जाणीव व्यक्त झालेली दिसून येते. स्मृतिकाळ व मध्ययुगीन काळात स्त्रीला गौण लेखण्यात आले. नंतर शिवकाळात व उत्तर पेशवाईच्या काळात स्त्रीमुक्तीच्या जाणिवेचा संकोच झालेला दिसून येतो. यानंतर उदयाला आलेल्या प्रबोधनकाळात स्त्रीमुक्तीच्या जाणिवांचे प्रबोधन युगामध्ये पुनरूज्जीवन झालेले दिसून येते. या दृष्टिकोनातून वैदिक संस्कृतीतील स्त्रीमुक्तीच्या जाणिवेचा ऐतिहासिक आढावा घेणे अत्यावश्यक ठरते.

स्त्रीमुक्तीची संकल्पना म्हणजे लिंगभेद नीती या संकल्पनेची प्रवर्तक आजच्या युगातून 'सिमॉन द बूव्हा' असली तरी 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या आ. ह. साळुंखे यांच्या ग्रंथात आर्यपूर्व संस्कृती मातृप्रधान संस्कृती होती. ''सिंधूपासून नाईलपर्यंतचा हा प्रदेश एकेकाळी मातृसत्ताक समाजव्यवस्थेखाली होता.'' असे लोकायत या ग्रंथात डॉ. स. रा. गाडगीळ यांनी सांगितले आहे.

'भारतीय स्त्री जीवन' या ग्रंथात 'प्रश्नांची पार्श्वभूमी' या प्रकरणात'' हिंदू स्त्री ही पहिली गुलाम होती.'' हा सिध्दांत गीता साने यांनी खोडून काढलेला आहे. स्त्री व पुरूष या दोहोत समानता होती. लिंगभेद नीती तेव्हा अस्तित्वात आलेली नव्हती, याची असंख्य उदाहरणे लेखिकेने सिंधुसंस्कृती विषयीच्या उल्लेखातून दिलेली आहे. हडाप्पा आणि मोहेंजोदारो इत्यादी उत्खननावरून व ''मेसापोटेमियाच्या बॅबिलोनच्या'' संस्कृतीवरून तसेच इजिप्तच्या प्रदीर्घ इतिहासातून साडेतीन हजार वर्षापूर्वी स्त्रीला स्वातंत्र्य होते असे दिसून येते.

भारतीय संस्कृतीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार पूर्ववैदिक काळापासून अस्तित्वात होता. पूर्ववैदिक काळात शिव आणि शक्ती एकरुप मानल्या जात होती. चिद्‌विलासवाद म्हणजे प्रत्याभिज्ञादर्शन या दर्शनात स्त्री-पुरुष समानता व्यक्त केलेली आहे. उदा. अभिनवगुप्ताच्या 'अभिनवभारती' व ज्ञानदेवांचा 'अमृतानुभव' हा ग्रंथ पूर्ववैदिक संस्कृतीतील म्हणजे श्रृती काळातील स्त्री-पुरुष समानतेची संकल्पना हळूहळू स्मृती काळात तिचा संकोच होत गेला असे प्रतिपादन 'हिंदु संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथात आ. ह. सांळुखे यांनी केले आहे.

वेदकाळात स्त्रियांना धर्मकारण, राजकारण, ज्ञानविज्ञानकारण आणि समाजकारण या सर्व बाबतीत पुरुषांसारखे समान हक्क होते. स्त्रीला पुरुषाचा खरा मित्र 'ऐतरेय ब्राह्मण' या ग्रंथात म्हटलेले आहे. 'सखा ह जाया' या अवतरणात समानताच दिसून येते. 'शतपथ ब्राह्मण' या ग्रंथात आई ही वडील व गुरुपेक्षाही वंदनीय मानल्या गेलेली आहे. ''मातृवान पितृवान आचार्यवान पुरुषो वेद'' या उक्तीत स्त्रीमुळेच संस्कृतीचा विकास झाला असे प्रतिपादन केलेले आहे.

त्याही काळात काही प्रमाणात पुत्र झाल्याचा आनंद मोठया प्रमाणात साजरा करण्यात येई कारण पुत्र म्हणजे 'पुम' नावाच्या नरकातून तो तरतो अशी समजूत होती. गुरुकुलात मुलगा व मुलगी यांना सहशिक्षण दिल्या जाई. अथर्व वेदानुसार तर मुलीचे उपनयन झाल्याशिवाय लग्नच होत नसे, स्त्रियांनी वेदातील ऋचा रचलेल्या आहेत. उदा. गार्गी पुरुषाप्रमाणेच यज्ञात स्त्रियांना पौरोहित्य करण्याचा अधिकार होता. विश्वावरा नावाची स्त्री ऋग्वेद काळात ऋत्विज म्हणून प्रसिद्ध होती. त्याकाळी शारीरिक व मानसिक शिक्षण दिल्या जाई. स्त्रिया युद्ध कौशल्यातही प्रवीण होत्या उदा. स्त्रीसेना नावाची स्त्री इंद्राविरुद्ध लढली. खेलराजाची पत्नी विष्पला आणि मुद्‌गलाची पत्नी इंद्रसेना पतीचा रथ शत्रूच्या व्यूहातून बाहेर काढीत असे. बालविवाहाची प्रथा नव्हती. स्त्रियांना आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. उदा. स्वयंवराची चाल. विवाहसमयी मुलीचे वय कमीतकमी वीस व मुलाचे वय कमीतकमी पंचेवीस राहत असे. घटस्फोट देण्याची पध्दती नव्हती व एकपत्नीव्रत आदर्श मानल्या जाई. पत्नीला पळविले किंवा तिच्यावर बलात्कार झाला तरी तिला अपवित्र मानन्यात येत नव्हते व तिचा त्यागही करण्यात येत नव्हता. पातिव्रत्याला महत्त्व होते.

ऋग्वेदकाळात पती मरण पावल्यानंतर आपल्या दिराशी लग्न करीत असे. वेदकाळात सती जाण्याची प्रथा नव्हती उलट पुनर्विवाह करण्याची परंपरा होती असे डॉ. ए. सी. दास व श्री. केणी यांनी सांगितले आहे. वेदकाळात विधवेला पतीची संपत्ती मिळत असे ऋग्वेदात सांगितलेले आहे. आपल्या न्याय्य मागण्यासाठी ती न्यायालयाची पायरी

चढत असे. काही दुर्बल तरुणींना वडील आश्रय देत असे. मुलीला मागणी घालून विवाह करण्याची पध्दती होती. हुंडा मागणे किंवा वरदक्षिणा मागणे हा प्रकार अजिबात नव्हता.

वेदकाळातील स्त्री-जीवनाचे विविध पैलू दिसून येतात ते पुढीलप्रमाणे आहे.

**लोपामुद्रा** – लोपामुद्रा ही अगस्ती ऋषीची पत्नी. अगस्तीचे नाव पूर्वी मान्य ऋषी होते. विंध्य पर्वत फोडून तो विदर्भात आला त्याचे वैराग्य व ज्ञान पाहून लोपामुद्राने त्याच्याशी विवाह केला. अगस्ती ऋषीची वृत्ती वैराग्ययुक्त निवृत्तीप्रधान होती पण लोपामुद्रेच्या प्रयत्नामुळे अगस्तीचे पौरुष जागे झाले.

**इंद्राणी** – इंद्राणीला स्त्री जागृतीचे काम केल्यामुळे स्त्रीमुक्तीची पहिली प्रणेती म्हणावे लागेल. विधवा हा प्रकारच नव्हता, आश्वलायन सूत्रातील मंत्रानुसार पुरुषच स्त्रीशी विवाह केल्यामुळे सौभाग्यवान होत असे. उदा. "गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तम् ...सहोत्रं स्म पुरा नारी समनं वाव गच्छति।'' डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या 'वेदकालीन स्त्रिया' या ग्रंथात वेदकालीन स्त्रियांचे सविस्तर वर्णन आलेले आहे. इंद्राणी ही स्त्रीमुक्ती चळवळीतील प्रमुख स्त्री होती तिने स्त्री जागृती करुन स्त्रियांची तत्कालीन कौटुंबिक जाचातून मुक्तता करुन स्त्रीमुक्तीचा आदर्श निर्माण केला. इंद्राणी ही इंद्रपत्नी असून ऋग्वेदातील संदर्भानुसार ती स्त्रीमुक्तीची पहिली प्रणेती ठरते. तीचे वर्णन ''वेधा ऋतस्य वीरिणींन्द्रपत्नी महीयते'' असे केलेले आहे.

**जुहू** – ही ऋग्वेदकालीन सुंदर व बुद्धिमान स्त्री होती. बृहस्पतीची पत्नी म्हणून तिचा उल्लेख येतो. तिने अनेक ऋचा लिहलेल्या आहेत. तिला सोम नावाच्या राजाने पळवून नेले तेव्हा बृहस्पतीच्या मनात तिच्याविषयी किल्मिष निर्माण झाले तेव्हा वरुण, मित्र, अग्नी, इंद्र व वायू हे सर्व पुढारी सोम ऋषीकडे गेले व त्यांनी तिची सुटका करण्याची विनंती केली पुढे बृहस्पतीने तिचा स्वीकार केला. याचाच अर्थ अपहरण किंवा बलात्कार केलेल्या स्त्रियांकडेही सहानुभूतीने पाहण्याची वृत्ती होती. सोम राजाने पळविले तरी जुहूला बृहस्पतीने पत्नी म्हणून स्वीकारले याचाच अर्थ पळविलेल्या स्त्रियांनाही सर्वत्र प्रतिष्ठा होती. उदा. रामायण काळातील अहिल्येचा उद्धार प्रभू रामचंद्राने केलेला दिसतो.

**अपाला** – ही तरुणी अत्री ऋषीची कन्या ती ब्रह्मवादिनी म्हणून प्रसिध्द होती. ती कुष्ठरोगाने पछाडलेली होती. अपालाने इंद्राला सोम नावाचे पेय दिले ते इंद्राने प्राशन केले. अपालाने इंद्राची प्रार्थना केली व आपल्या पतीकडून परत आल्यानंतर ती इंद्राकडे गेली व इंद्राने तिचा स्वीकार केला. परित्यक्ता व कुष्ठरोगी स्त्रियांचा स्वीकार करण्याची पध्दती त्याकाळी समाजात होती.

**सूर्या** – सूर्या ही सूर्याची मुलगी पण तिचे पालन पोषन प्रजापतीने केले. तिने अनेक ऋचा रचल्या त्या ऋचांचा समावेश ऋग्वेदात आहे. सोम राजाने तिला मागणी टाकली सोम हा राजा बदफैली होता. तिने सोमाला नकार दिला. याचाच अर्थ स्त्रीला आपल्या इच्छेनुसार लग्न करण्याचे स्वातंत्र्य होते. पुढे सूर्याने अश्विन याचे कौतुक केले व अश्विनाशीच विवाह केला. वेदकाळात सामान्य जनता स्त्रियांच्या न्याय्य हक्काबद्दल व सुखी जीवनाबद्दल सतत स्त्रियांच्या पाठीशी उभी राहत असे. वेदकाळात स्त्रीमुक्तीच्या चळवळीला पुरुषांनी पाठिंबा दिलेला आहे.

**विश्पला** – ही वेदकाळातील सुस्वरुप तरुणी 'खेल' नावाच्या राजाशी तिचा विवाह झाला. ती युध्द नितीतही प्रवीण होती. दुष्काळ पडलेला असतांना स्त्रियांची सेना उभारुन विश्पलेने शेजारच्या राज्यातील कोठारे लुटली. प्रत्यक्ष युद्धात रणचंडिकेसारखी ती लढत होती. याचाच अर्थ त्याकाळी स्त्रिया युद्धात लढत होत्या.

**घोषा** – ही वेदकाळातील जरठ कुमारिका होती. वेदकाळात आई-वडील मुलींचे खुप लाड करीत व अशा लाडामुळे मुलींचे लग्नाचे वय निघून जाई, घोषाने अनेक वेदांचे पठण केले होते. तिच्या वडिलांच्या घरी अशा जरठ कुमारिकांना वाटा मिळत असे. वेदकाळात स्त्री-पुरुषांविषयीचा समान आदर दिसून येतो.

**उर्वशी** – वेदकाळातील उर्वशी ही अप्सरेसारखी सुंदर स्त्री होती. 'पुरुरवाशी' विवाह केला होता. पुरुरवा हा राजा विलासी होता. तो अनेक स्त्रियांशी रममान होत असे, याने प्रपंचातील सर्व कामाकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे उर्वशीने पुरुरवाचा त्याग केला. नवरा विलासी असला तर त्याचा त्याग करुन सोडून देण्याची पद्धती त्याकाळी होती.

**उषादेवी** – उषादेवी नावाची स्त्री वेदकाळात दिसून येते. उषादेवीने त्याकाळात समाजाचा विवेक जागा केला. तिने वैद्यराज अश्विनाच्या सहाय्याने हरिश्चंद्राचा जलोदर नावाचा रोग बरा केला. नरबळी देण्याची पद्धती होती ती बंद केली. त्या काळातील अनेक दुष्ट रूढी बंद केल्या. शुद्ध आहार व सद्‌वर्तन याचे महत्व लोकांना पटविले.

**अदिती** – ही वेदातील मातृत्वाचे प्रतीक असणारी स्त्री. इंद्र हा अदितीचा पुत्र आहे. तिने इंद्रावर खूप प्रेम केले. 'अ' म्हणजे नाही आणि 'दिती' म्हणजे मर्यादा. अदिती म्हणजे मर्यादा नसणारी स्त्री. पृथ्वीने सर्व दिशांना जन्म दिला. विश्वनिर्माणानंतर निर्मितीक्षम अशी आई अदिती निर्माण झाली. अदितीचे प्रतीक म्हणजे मातृत्व होय. स्त्री ही एक आदिशक्ती आहे याची जाणीव अदितीच्या रूपाने होते.

**सरस्वती** – वेदकाळात सरस्वती नावाची स्त्री ही विद्येची देवता म्हणून प्रसिद्ध आहे. जनसामान्यांच्या उद्धारासाठी तिने संघर्ष केला. आपले ज्ञान सर्व समाजाला दिले. सरस्वतीमुळे समाज सुशिक्षित झाला म्हणून सरस्वती ही वाणीची देवता मानल्या जाते.

**दासपत्नी** – वेदकाळी दासपत्नी ही स्त्री ज्ञान आणि विज्ञान याची उपासना करीत होती. दासपत्नी ही वृत्राची आई आहे. तिने इंद्राशी युध्द पुकारले. वेदकालीन दासपत्नीची वीरगाथा सर्वानाच माहीत आहे.

**जबाला** – वेदकाळातील सत्यकाम ऋषीची आई जबाला ही वेश्या व्यवसाय करीत असे पण तिने मुलाला सत्यकामाला शिकविले म्हणून तिचे स्थान महत्वपूर्ण आहे.

**इतरा** – इतरा ही ऋषी पत्नी तिनेही ऋग्वेदावर भाष्य लिहिले आहे. पुढे 'ऐतरेय ब्राह्मण' नावाचा ग्रंथ तिच्या सहाय्यानेच निर्माण झाला.

**सुकन्या** – ही वेदकालीन स्त्री ती कर्तृत्ववान स्त्री म्हणून प्रसिद्ध आहे. तिने 'राजयक्ष्मा' या रोगावर औषध शोधण्याचा प्रयत्न केला. तिचे वैद्यक शास्त्रातील ज्ञान पाहून अश्विनकुमारांनी तिची स्तुतिही केली आहे.

**मैत्रेयी** – ही अत्यंत विद्वान स्त्री याज्ञवल्क ऋषीला तिने त्याचे ज्ञान पाहून वरले. भौतिक संपत्ती तिने तुच्छ ठरवून अमृतासमान आत्मज्ञानाचे मागणे याज्ञवल्काजवळ मागितले. ज्ञानाचे प्रतीक म्हणून मैत्रेयीचे उदाहरण नेहमी आपल्यापुढे आदर्शवत राहील.

**इंद्रसेना** – याच काळात इंद्रसेना ही वीर स्त्री निर्माण झाली. गार्गी व मैत्रेयी तसेच कात्यायनी अशा तिघीही याज्ञवल्क ऋषीच्या पत्नी होत्या. याच काळात शशीयशी व मेधा या दोन स्त्रियांनीही बुद्धिवादी व विज्ञाननिष्ठ भूमिकेने वैदिक संस्कृतीची पायाभरणी केली. अशारीतीने पूर्ववैदिक कालखंड स्वातंत्र्य, समता व बंधुता या आजच्या युगातील व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्वाचा अविष्कार करणारा होता. स्त्री जीवनातील सुवर्णयुग असाच उल्लेख आपल्याला या काळाचा करावा लागेल.

वेदाचे तीन भाग पडतात १) पूर्वकांड २) मध्यमदेवताकांड ३) उत्तरज्ञानकांड ऋग्वेदात स्त्रियांना यज्ञाधिकार होता. उदा. १० वे मंडल व ८६ वे सूक्त. वैदिक कालखंडात आर्यांची पितृसत्ताक पद्धती असली तरी स्त्रियांना शिक्षणाचा व उपनयनाचा अधिकार होता असे दिसून येते.

पौराणिक वाङ्मयात प्रजापतीने स्त्रीची निर्मिती केली असा उल्लेख आहे. स्त्रियांची त्याकाळी दोन गटात वर्गवारी केल्या गेली होती. एक 'ब्रह्मवादिनी' दोन 'सद्योवधू' या काळातही स्त्रियांचे स्वातंत्र्य मर्यादित प्रमाणातच होते. असे आ. ह. साळुंखे यांनी सांगितले आहे. मनुस्मृती या ग्रंथातील अनेक उदाहरणे देऊन वैदिक काळात कर्मसिध्दांत व पुनर्जन्माचा पगडा लोकांच्या मनावर होता. साधारणतः '' स्त्रीशूद्रोनाधीयाताम् – स्त्री व शूद्र यांनी अध्ययन करु नये.'' स्त्रिया व शूद्र यांचा समान धर्म म्हणजे सेवा करणे होय. अशीच विचारसरणी होती. स्मृतिकाळात स्त्रीचा दर्जा दुय्यम स्वरुपाचा झाला व स्त्रीला शूद्रांच्या पंक्तीत बसविण्यात आले.

धर्माच्या आधाराने कर्मविपाक व पुनर्जन्मांच्या सिद्धांताचा उपयोग स्त्रीच्या अवमूल्यनासाठी करण्यात आला. उदा. ''गतजन्मीच्या पापामुळे स्त्रीजन्म येतो किंवा वैधव्य येते म्हणून ह्या जन्मी धर्मविहित कर्मे करीत राहा, म्हणजे पुढील जन्मी तुला उत्तम गती प्राप्त होईल.'' अशी बुद्धिभेदाची शिकवण देण्यात आली.

चार्वाक, वराहमिहिर व बृहद्संहितेत मात्र स्त्री शिक्षणाची आवश्यकता सांगितलेली आहे. बुद्धांच्या 'थेरी गाथेत' कौटुंबिक जाचातून सुटण्यासाठी स्त्रिया भिक्षुणी बनल्या असा उल्लेख आहे. वास्तविक धर्म समाजाला उपकारक व व्यक्तिला न्याय देणारा असला पाहिजे पण स्मृतिकाळात अशारीतीची समता दिसून येत नाही.

८डिसेंबर ते २५ डिसेंबर १९९४ या काळात संस्कृतच्या प्राध्यापिका कुमुद पावडे यांनी 'लोकमत' मध्ये 'स्त्रियांना वेदपठणाचा अधिकार' अशी लेखमाला लिहिली, या लेखमालेत शंकराचार्याने स्त्रियांना वेदपठणाचा अधिकार नाकारला असे सांगितले आहे. शंकराचार्याच्या मते वैदिक मंत्र स्वरांचा त्यांच्या गर्भाशयावर परिणाम होऊन प्रसुती कष्टमय होते पण आजच्या प्रसुतीशास्त्रात वैज्ञानिक दृष्टीने असे काहीच आढळत नाही.

स्मृतिकाळात स्त्रियांना उपनयन संस्काराचा अधिकार नाकारल्या गेला मनूने स्पष्टच म्हटले आहे की, स्त्रियांना उपनयन संस्काराचा अधिकार नाही. ''नास्तिस्त्रीणा क्रिया मंगेरति धर्मे व्यवस्थिती''– मनू

रामायणात सीता संध्या करीत होती असा उल्लेख आहे. पतंजलीच्या काळापर्यंत खिस्तपूर्व दुसऱ्या शतकापर्यंत स्त्रियांना उपनयन व वेदाध्ययनाचा अधिकार होता, हे पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथावरुन व पतंजलीच्या 'व्याकरण महाभाष्य' या ग्रंथावरुन दिसून येते. श्रुतींचा उज्वल भविष्यकाळ स्मृतिकार विसरले त्यामुळे पूर्ववैदिक काळातील स्त्रियांना समान स्वातंत्र्य दिल्या जात होते, या उज्वल परंपरेचा विसर पौराणिक काळात पडला व स्त्री स्वातंत्र्याचा सर्वत्र संकोच झाला. असे प्रतिपादन लेखकाने 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथात केलेले आहे.

मनुस्मृतीने स्त्रीचे दास्य अत्यंत स्पष्टपणे सांगितलेले आहे. भारतात परंपरा व न्यायव्यवस्था ह्या धर्मशास्त्राचा भाग असल्याने स्मृतीच्या आज्ञांचे पालन काटेकोरपणे करण्यात येत असे, स्मृतिकाळाने स्त्री म्हणजे एक साधनमात्र

वस्तू ठरली. स्त्री म्हणजे भस्त्रा म्हणजेच कातडयाची पिशवी पुरुषाचे बीज पेरण्यासाठी तिचा उपयोग होत असे म्हणून ''स्त्री शेत व पुरुष शेतकरी ठरला.'' मनुस्मृतीत 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे वर्णन आलेलेच आहे. स्त्रीला धन मानल्या गेले पापी कृत्याच्या कल्पना तिच्यावर लादल्या गेल्या. वर्णसंकर होऊ नये म्हणून असे ग्रंथ लिहिल्या गेले. उदा. याज्ञवल्क्य स्मृतीत ''शुद्राने व्दिजस्त्रीगमन केल्यास त्याला गवताच्या गंजीत जाळावे व बौधायनाने वैश्याने ब्राह्मण स्त्रीशी समागम केल्यास त्याला एक वर्ष बंदिवासाची शिक्षा करुन त्याची संपत्ती हरण करावी पण क्षत्रियाने तोच गुन्हा केल्यास त्याला एक हजार मुद्रा दंड करावा व मूत्राने त्याचे क्षौर करावे'' अशी शिक्षा मनुस्मृतीत सांगितलेली आहे.

त्यावेळच्या समाजात बहुसंख्य स्त्रिया शूद्र वर्गातील होत्या. त्यांची स्थिती अधिकच बिकट होती. भारतीय संस्कृती पुरुषप्रधान व वर्णप्रधान आहे असे कॉम्रेड शरद पाटील यांनीही 'दासशूद्रांची गुलामगिरी' या ग्रंथात सांगितलेले आहे. स्त्रीवर जशी धर्मशास्त्राने बंधने टाकली तशी पुरुषांवर टाकलेली दिसत नाही. स्त्रीविषयी निंदा व वैराग्य पुढील घटकातून दिसून येते. उदा.''राधाकृष्णांच्या शृंगाराची पदे गाऊन त्यांचा आध्यात्मिक अर्थ लावणारा राधावल्लभी पंथ किंवा मद्य-मांस-मैथुनाने परस्त्रीची चक्रपूजा करणारा तांत्रिक वर्ग अस्तित्वात आला.'' स्त्री विषयीची विकृत मनोवृत्ती अस्तित्वात आली. उदा. आजही हिंदूची दोन योनिमंदिरे आहे. एक आसामात गोहाटीला व दुसरे नेपाळात खाटमांडूला. ह्या मंदिरात आजही योनिपूजा होते. आचार्य रजनिशांचा 'संभोगातून समाधीकडे' हा पंथही विकृत मनोवृत्तीचा निदर्शक आहे.

स्त्री ही एक उपभोग प्रधान साधन म्हणून भारतीय स्मृतीकारांनी पाहीले. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे आईची नैसर्गिक मायाही आटली. उदा. नवऱ्याच्या आज्ञेवरुन चांगुणेने चिलयाची मान, डोळयांतून टिपूस न गळता, कापून उखळात कांडल्याची पुराणातील कथा, रामाने सीतेला ''रावणाच्या घरात तू शुध्द कशावरुन राहिलीस?'' असा प्रश्न विचारणाऱ्या रामाला सीता उत्तर मागतांना दिसत नाही. तसेच कर्णाला कुंवारपणीच टाकून दिल्याची घटना कुंतीच्या जीवनात दिसते. ''जीवनातील विटंबनेला विटलेली सीता, नालायक नवऱ्यापुढे हतबल झालेली द्रौपदी, वंचनेने संतापलेली शकुंतला अशा अपवाद स्वरुप स्त्रियांचे सूर अधूनमधून कानावर पडतात.'' एकूणच स्मृतीकाळात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे अवमूल्यन झालेले दिसते. अपवादभूत गोष्ट म्हणजे बौध्द काळात 'थेरी-गाथा' सारख्या बौध्द भिक्षुणींच्या व्यथा वर्णन करणारा ग्रंथ प्रसिध्द झालेला आहे. बौध्द वाङ्.मयात समाजातून येणाऱ्या सर्वच स्तरातील स्त्रियांची सुखदुःखे व्यक्त होतात. पण या ग्रंथाकडे आजच्या काळातही दुर्लक्ष झालेले आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीमुळेच स्त्रीवर अनन्वित अत्याचार होत गेला उदा. ''अतिथिंना नग्न होऊन भोजन वाढ किंवा मला पाठुंगळी घेऊन वेश्येकडे पोचव.'' अशा आज्ञाही पत्नीला मान्य कराव्या लागत, असे मनुस्मृतीवरुन दिसते. कारण विवाह हा एक संस्कार होता. तो मुस्लीम पध्दतीप्रमाणे करार नव्हता. उत्तर प्रदेशात तर पती मेल्यावर धाकटया दिराशी संसार करण्याची पध्दती होती व निधनानंतर सती जाण्याचीही पध्दती होती.

**निष्कर्ष** -

१) सिंधू संस्कृती, हडाप्पा व मोहेंजोदारो काळातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये स्त्रीला महत्वाचे स्थान असल्याचे आढळते.

२) वेदकाळामध्ये स्त्रियांना धर्मकारण, राजकारण, ज्ञानविज्ञानकारण आणि समाजकारण या सर्व बाबतीत पुरुषांसारखे समान हक्क असल्याचे दिसते.

३) वेदकाळात 'स्व'प्रतिमा निर्माण करुन आपल्या कर्तव्याने, अभिमानाने एक व्यक्ती म्हणून अस्तित्व सिध्द करणाऱ्या स्त्रिया आढळतात.

४) इंद्राणी ही स्त्री-जागृती व स्त्री-मुक्ती विचारांची प्रणेती ठरते.

५) वेदकाळातील स्त्रियांचे धर्म व युध्दनीतीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण असे स्थान आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१) साळुंखे, आ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, १९९३.

२) साने, गीता, भारतीय स्त्री-जीवन, मौज प्रकाशन, मुंबई, १९९३.

३) आष्टीकर, मधुकर, वेदकालीन स्त्रीया, सुरेश एजन्सी, पुणे, १९९३.